**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात २८८ नगरपालिका, आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणूक निकालात महायुतीतल्या घटक पक्षांची सरशी, भाजपाला सर्वाधिक जागा

- जी राम जी विधेयकावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची स्वाक्षरी

- रेल्वेची भाडेवाढ येत्या २६ तारखेपासून लागू होणार

**आणि**

- १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात भारतावर १९१ धावांनी मात करत पाकिस्ताननं पटकावलं विजेतेपद

**<><><><><>**

महाराष्ट्रात २८८ नगरपालिका, आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांच्या निकालात महायुतीतल्या घटक पक्षांनी सरशी साधली असून, भाजपानं सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसनंही चांगलं यश मिळवलं, मात्र महाविकास आघाडीतल घटक पक्षांना अपेक्षित यश मिळालं नाही.

तीन नगराध्यपदांसाठीच्या निवडणूका याआधीच बिनविरोध झाल्या होत्या. आजच्या मतमोजणीची अधिकृत आकडेवारी अद्याप निवडणूक आयोगाकडून मिळाली नाही. मात्र या मतमोजणीच्या दुपारी तीन वाजेपर्यंतच्या कलांनुसार भाजपानं १२९ नगरपालिकांमध्ये विजय मिळवला, तर महायुतीतल्या घटक पक्षांनी मिळून २१५ नगरपालिका जिंकल्या असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाज माध्यमावर दिली आहे. या निवडणुकीत भाजपानं एकट्यानं नगरसेवकपदाच्या ३ हजार ३२७ जागा जिंकल्या आहेत, तर महायुतीतल्या घटक पक्षांनी मिळून ४ हजार ३३१ जागा जिंकल्या असल्याचं त्यांनी म्हटलंय.

<><><><><>

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत भाजपा आणि महायुतीला दिलेल्या समर्थनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी राज्यातल्या जनतेचे आभार मानले आणि या सर्वांनी दाखवलेल्या विश्वासाला साजेसं विकासकार्य करायचं आश्वासन दिलं. ते नागपुरात बातमीदारांशी बोलत होते. या निवडणुकीत आपण फक्त विकासावर मतं मागितली, असं त्यांनी सांगितलंलं.

***होल्ड… बाईट- देवेंद्र फडनवीस( २५ सेकंद)***

नगरपालिका निवडणुकीत मतदारांनी विकासाला पसंती दिल्यामुळेच शिवसेनेला चांगलं यश मिळालं, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात वार्ताहर परिषदेत केलं. तर, या निकालांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या विकासात्मक, सर्वधर्मसमभावी भूमिकेवर शिक्कामोर्तब झालं, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलंय.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या विजयाबद्दल राज्यातल्या महायुतीच्या नेत्यांचं आणि कार्यकर्त्यांचं अभिनंदन केलं आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या सर्वांचं अभिनंदन केलं असून, भाजपाच्या विकासाभिमुख कार्यशैलीवर मतदारांनी विश्वास ठेवल्याचं समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाचा गलथान कारभार अधोरेखित झाला आहे, अशी टीका हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. ही निवडणूक मुक्त आणि न्याय्य पद्धतीनं झालेली नाही, असा आरोप त्यांनी केला.

***होल्ड… बाईट- हर्षवर्धन सपकाळ( २५ सेकंद)***

या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाला अपेक्षित यश मिळालेलं नसलं, तरी काँग्रेस लोकशाही आणि राज्यघटनेच्या रक्षणासाठी संघर्ष करत राहील, असं सपकाळ यांनी सांगितलं.

<><><><><>

विकसित भारत रोजगार हमी आणि आजीविका अभियान ग्रामीण, म्हणजे जी राम जी विधेयकावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वाक्षरी केली आहे. मनरेगा योजनेची जागा घेणारा हा कायदा एका आर्थिक वर्षात ग्रामीण भागतल्या प्रत्येक कुटुंबात १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देतो. गेल्या आठवड्यात संसदेच्या दोन्ही सभागृहांनी हे विधेयक मंजूर केलं होतं. ग्रामीण भागात आत्मनिर्भरता, समृद्धी , सर्वसमावेशक विकास आणि सक्षमीकरण ही या कायद्याची उद्दिष्टं आहेत. हा कायदा ग्रामीण भारताच्या विकासातला मैलाचा दगड ठरेल असं ग्रामविकास मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त इंदोर इथं आयोजित, शून्य से शतकः एक शताब्दी अटल भारत की, या कार्यक्रमात उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज भाग घेतला. डेली महाविद्यालयाच्या आवारात लोकमाता अहिल्यादेवी होळकरांच्या पुतळ्याचं अनावरणही यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते झालं. मध्य प्रदेशाचे राज्यपाल मांगूभाई पटेल, मुख्यमंत्री डॉक्टर मोहन यादव यांच्यासह इतर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

रेल्वेने प्रवासभाडे आकारणीत बदल केले असून ते येत्या २६ डिसेंबरपासून लागू होणार आहेत. यात सर्वसामान्य वर्गाच्या प्रवास भाड्यात २१५ किलोमीटर अंतरापर्यंत काहीही बदल झालेला नाही. त्यापुढच्या सामान्य वर्गाच्या प्रवासाकरता प्रतिकिलोमीटर एक पैसा तर मेल - एक्सप्रेस गाड्यांसाठी प्रति किलोमीटर २ पैसे

भाडेवाढ झाली आहे. ५०० किलोमीटर अंतराच्या प्रवासाकरता १० रुपये जास्त मोजावे लागतील. उपनगरी गाड्याच्या प्रवासभाड्यात बदल केलेला नाही असं रेल्वेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

१९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज दुबई इथं झालेल्या अंतिम सामन्यात पाकिस्ताननं भारतावर १९१ धावांनी मात करत विजेतेपद पटकावलं.

या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून पाकिस्तानला प्रथम फलंदाजीसाठी निमंत्रित केलं. पाकिस्ताननं निर्धारित ५० षटकांत ८ गडी गमावून ३४७ धावा केल्या. त्यात सलामीवीर समीर मीनहास याच्या १७२ धावांचा मोठा वाटा होता. तो या सामन्यातला आणि स्पर्धेतलाही सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला.

विजयासाठी ३४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना २७व्या षटकांतच भारताचा डाव १५६ धावात आटोपला.

**<><><><>**

भारत आणि श्रीलंका महिला क्रिकेट संघांमधल्या टी-२० मालिकेतला पहिला सामना आज विशाखापट्टणम इथं सुरू आहे. भारतीय संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

**<><><><>**

इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्था, येत्या बुधवारी ‘ब्लूबर्ड ब्लॉक-२’ हा दूरसंवाद उपग्रह प्रक्षेपित करणार आहे. अमेरिकेच्या ‘AST स्पेसमोबाइल’ या कंपनीचा हा उपग्रह, LVM3 या उपग्रह प्रक्षेपकाद्द्वारे पृथ्वीच्या निम्न कक्षेत, पोहोचणारा सर्वात मोठा व्यापारी उपग्रह असेल.

'ब्लूबर्ड ब्लॉक-२' कंपनीचा हा पुढल्या पिढीतला दूरसंवाद उपग्रह, मोबाईल स्मार्टफोन्सना अवकाश-आधारित सेल्युलर ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी थेट मिळवून देण्यासाठी डिझाईन केला आहे.

इस्रोनं विकसित केलेला LVM3 हा तीन टप्प्यांमधला उपग्रह प्रक्षेपक असून, याच्या साहाय्यानं चांद्रयान-२ आणि ३ चं प्रक्षेपण करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसममधे नामरूप इथं १२ हजार कोटी रुपयांच्या अमोनिया युरिया खत प्रकल्पाचं भूमिपूजन केलं. या कार्यक्रमापूर्वी त्यांनी शहीद स्मारक क्षेत्र इथं अवैध स्थलांतरितांविरुद्धच्या आसाम आंदोलनातल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. तसंच त्यांनी ब्रह्मपुत्रा नदीतल्या बोटीवर स्थानिक शाळांमधल्या २५ विद्यार्थ्यांशी परीक्षा पे चर्चा केली.

**<><><><><>**

अरवली पर्वतरांगाची नवी व्याख्या केवळ मोठ्या प्रमाणावर खाणकामाला मोकळीक देण्यासाठी केली असल्याच्या आरोपाचं केंद्र सरकारने खंडन केलं आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी आज सुंदरबन व्याघ्रप्रकल्पात वार्ताहरांना सांगितलं की सर्वोच्च न्यायालयानं या परिसरात नवीन खाणकामाला स्थगिती दिली आहे. आणि नवीन व्याख्येनुसार अरवली डोंगररांगांमधला ९० टक्के परिसर संरक्षित झाला आहे.

**<><><><><>**

धुकं आणि कमी दृश्यमानतेमुळे विमान वाहतूक विस्कळीत झाली, तर विमान कंपन्यांनी प्रवाशांच्या सोयींबाबतच्या नियमांचं काटेकोरपणे पालन करावं, आणि विमानतळांवर पुरेसे कर्मचारी नियुक्त करावेत, असे निर्देश केंद्रसरकारनं दिले आहेत. हवाई वाहतूक मंत्रालयानं आज याबाबतचं प्रसिद्धीपत्रक जारी केलं.

विमान कंपन्यांनी प्रवाशांना विमानाच्या स्थितीबाबत वेळेवर आणि अचूक माहिती द्यावी, प्रवासाला अधिक विलंब झाला, तर भोजन आणि अल्पोपहाराची व्यवस्था करावी, तिकीट रद्द झालं, तर पुन्हा आरक्षण अथवा तिकिटाच्या पैशाचा परतावा करण्याची व्यवस्था करावी, अशा सूचनाही यात दिल्या आहेत.

**//<><><><><>//**